／ # सेवक वार्ता

e-mail : http://www.mahasevak.com

१, वर्ष - १

जानेवारी २०२०

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, पुणे**

**नोंदणीकृत कार्यालय -ब-८, सारसनगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२**

**दि.२२/०१/२०२० सेवकची वार्षिक सर्वसाधारण सभा (General Body meeting) संपन्न -** आज सेवानिवृत्त वन कर्मचारी संघाची तेविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा आनंद मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शे. हिं. पाटील, निवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक हे होते. मंचावर सेवकचे अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना, कार्यकारी अध्यक्ष श्री. वि. त्र्यं. पत्की, श्री. शैलेंद्र बहादूर हे हजर होते. सर्वप्रथम मागील वर्षात दिवंगत झालेले सदस्य सर्वश्री व्हि. व्हि. खोत, एस.जी. बापट, एस. ए. मुंडकुर, श्री. गाडबैल, श्री. जवळेकर व श्री. देवेंद्रकुमार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर सेवकचे अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना यांनी स्वागतपर भाषण केले. यामध्ये त्यांनी संघाचे गतवर्षीचे कामांची माहिती दिली. त्यानंतर सभासदांनी आपला परिचय करुन दिला. त्यानंतर मागील वर्षीच्या (बाविसाव्या) सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तास उपस्थित सदस्यांनी हात वर करुन मान्यता दिली. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेक्षापरिक्षणाचे वाचन करण्यात आले व त्यास सदस्यांनी मान्यता दिली.

संघाचे कार्यकारी अध्यक्ष श्री. वि. त्र्यं. पत्की यांनी २०२०-२१ या वर्षाचे लेखा परिक्षणासाठी नवीन लेखापरिक्षक श्री. शशांक पत्की यांचे नाव सुचविले व त्यास सदस्यांनी मान्यता दिली. त्यानंतर कार्यकारी अध्यक्ष श्री. पत्की यांनी संघ मुंबई येथील डेडिकेटेड ॲग्री सर्व्हिसेस यांचे सोबत काही प्रकल्पावर काम करण्यास प्रयत्नशिल असल्याचे सांगितले. नवनियुक्त लेखा परिक्षक श्री. शशांक पत्की यांनी परदेशातून प्राप्त निधी बाबतच्या कायद्यांसंबंधी (FCRA) माहिती दिली. त्यानंतर केंद्रीय कार्यकारीणीची पॅनेल पध्दतीने निवडीसाठी प्राप्त यादी जाहिर केली. यामध्ये श्री. शिरिष अस्थाना, डॉ. शे. हिं. पाटील, श्री. विजय भोसले, श्री. सं. खं गवळी, श्री. उमेश धोपेश्वरकर, श्री. विवेक डावरे यांचा समावेश आहे.

त्यानंतर अमरावती शाखेचे श्री. संजय जगताप यांनी मागील वर्षात केलेल्या कामाबाबत माहिती दिली.

१.पांढरकवाडा वन विभागातील वन विकास यंत्रणेचे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले.

२.पुसद वनविभागातील वन विकास यंत्रणेचे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले.

३.बांबू विकास मंडळाकरिता अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्हयातील बांबू कारागिरांची गणना करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

४.आयुर्वेदात महत्वाच्या १२ रोपांचे एकत्रित महत्व विशद करणारे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले.

५. ५० कोटी वृक्ष लागवड योजनेत अमरावती वृत्ताने सहभाग घेतला.



फेटरी येथील रोपवनाचे मुल्यांकन करताना चमु (डिसेंबर २०१९)

त्यानंतर सेवक संघ शाखा धुळे यांनी २०१९-२० मध्ये केलेल्या कामांची माहिती दिली.

१. या वर्षात वनविकास यंत्रणा, मेवासी विभागाच्या ८ रोपवन कामांचा मूल्यांकन कामाचा अहवाल उपवनसंरक्षक मेवासी यांना सादर करण्यात आला.

२. धुळे महानगर पालिकेस ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९ च्या मोहिमेसाठी वृक्ष लागवडीचा सूक्ष्म आराखडा त्यांचे मागणीनुसार रु.२०,०००/- शुल्क आकारुन तयार करुन देण्यात आला.

३. मु.का.अ.जि.प.नंदुरबार यांचेकडे जैविक विविधता नोंदवही तयार करणेचे काम मिळणेसाठी माहे ऑक्टोबर २०१९ मध्ये पत्र व्यवहार करणेत आला- अद्याप प्रतिसाद नाही.

४.महानगरपालिका, धुळे यांचेकडे वृक्ष गणनेचे काम सेवक संघास मिळणेबाबत पत्रव्यवहार डिसेंबर २०१९ मध्ये करण्यात आला. प्रतिसाद प्रतिक्षित आहे.

५.नगरपरिषद, पारोळासाठी जैवविधिता नोंदवही तयार करणेकामी वृत्तपत्रातील जगहिरातीस अनुसरुन

दरपत्रक माहे जानेवारी २०२० सादर करण्यात आले होते. तथापि ते नामंजूर झाल्याचे कळविण्यात आले.

६.धुळे शाखेचे आजीवन सदस्य श्री.एम.बी. परवर्धन यांच्या सेवानिवृत्ती विषयक प्रकरणाचा पाठपुरावा करणेत येत आहे.

७.२८ मे २०१९ रोजी सन २०१८-१९ ची वार्षिक सर्वसाधारण सभा धुळे येथे घेण्यात आली.

८. धुळे शाखेचे मासिक रोखलेखा दरमहा नियमितपणे केंद्रीय शाखा व सनदी लेखापाल, पुणे यांना सादर करणेत आले.

९. बारीपाडा, ता. साक्री, जि.धुळे येथे दरवर्षी घेण्यात येणा-या रानभाज्या महोत्सवाचे निमित्ताने, एक घडीपत्रिका छपाई व छायाचित्रे संकलन चालू आहे.

१०. धुळे शाखेतील सदस्यांना सातपुडयातील पारंपारिक वनौषधी हे डॉ. शेषराव पाटील लिखीत पुस्तक संघाचे मार्फत विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. प्रकाश कुकडोलकर यांनी केले.

याप्रसंगी श्री. सलीम सरदार मुल्ला वनरक्षक, कोल्हापूर वनविभाग यांच्या जंगल 'खजिन्याचा शोध' आणि 'ॠतूचक्र' या साहित्य पुरस्कार प्राप्त पुरस्कांराबाबत त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. हिरेमठ यांनी त्यांना वैयक्तीक रोख रक्कम देऊन सत्कार केला.



सत्कारास उत्तर देतांना त्यांनी सेवकचे आभार मानले व आपले साहित्याबाबत मनोगत व्यक्त केले.

दुपारी ४ वाजता सेवकचे मंचावर ज्ञानेश्वरी टुडे या श्री. त्र्यंबक चव्हाण यांनी मराठीत भाषांतरीत केलेल्या व श्री. वसंत जोशी यांनी इंग्रजीत भाषांतरीत केलेल्या ज्ञानेश्वरी चे पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. विशेष म्हणजे त्यांनीच या पुस्तकाचे संपादन केलेले आहे. या प्रसंगी त्यांनी परम या महासंगणकाचे काम करताना व त्यावर भगवद्गीता टाकण्याबाबतच्या -हद आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमास प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, पंडित वसंतराव गाडगीळ तसेच डॉ. श्री. एस. एन. पठाण, सेवानिवृत्त कुलगुरु नागपूर विद्यापीठ हे प्रामुख्याने हजर होते.



कार्यक्रमाचे सुरुवातीला दीपप्रज्वलन करताना मान्यवर

या कार्यक्रमाचेवेळी सेवकचे पदाधिकारी व सदस्यांसह इतर जेष्ठ वनअधिकारी श्री. माधव गोगटे, श्री. एम.एच. खेडकर हे देखील हजर होते.




या प्रसंगी या त्रैभाषिक ज्ञानेश्वरीची सवलतीचे दरात विक्री करण्यात आली व श्री. जोशी यांनी विक्री करुन प्राप्त रक्कम रु १६५०० हे सेवक संस्थेस देणगी दाखल दिली. त्यांचे दातृत्वाबद्दल हार्दिक आभार!!

**दि.२९/०१/२०२० सेवक कार्यकारी समितीची नवनियुक्त प्रधान सचिव वने यांची भेट –**

मुंबई - सेवक समितीचे अध्यक्ष श्री. शिरीष अस्थाना श्री. वि. त्र्यं. पत्की व डॉ. शे. हिं. पाटील यांनी मुंबई येथे प्रधान सचिव वने श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना सेवकच्या उपक्रमांची माहिती दिली. भविष्यात सेवक वन विभागाचे जैवविविधता नोंदवही, वनसंरक्षक समित्यांचे मुल्यांकन, वन प्रशिक्षणात योगदान, रोपवनांचे मुल्यांकन इ. कामे करण्यात उत्सुक असल्याचे सांगितले. प्रधान सचिवांनी याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केले. या प्रसंगी समिती सदस्यांनी सहसचिव वने श्री. अरविंद आपटे यांची देखील भेट घेतली. समिती सदस्यांनी या प्रसंगी डेडिकेटेड अॅग्री सर्व्हिसेस कार्यालयास भेट देऊन श्री. मंगेश देसाई यांचेशी भागीदारीत प्रकल्प कामे करण्याबाबत चर्चा केली.

-------------------------------------

प्रकाशक : सेवक, पुणे
संपादन : डॉ. शे. हिं. पाटील, भावसे (सेवानिवृत्त) प्रधान मुख्य वनसंरक्षक